**महाराष्ट्र शासन**
**नगर विकास विभाग**
**४ था मजला, मुख्य इमारत, मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.**
**दिनांक :- ११ फेब्रुवारी २०२०.**

**महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६**

**<u>शुध्दीपत्रक</u>**
**क्रमांक: टिपीएस-१२१९/१८६५/प्र.क्र.१०८/१९/शुध्दीपत्रक/नवि-१२,**

ज्याअर्थी, शासन, नगर विकास विभागाने महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे (यापुढे ज्याचा उल्लेख 'उक्त अधिनियम' असा करण्यात आला आहे) कलम ८६ चे उपकलम (२) मधील तरतूदीनुसार अधिसुचना क्र. टिपीएस-१२१९/१८६५/प्र.क्र.१०८/१९/नवि-१२, दि.३/९/२०१९ अन्वये (यापुढे ज्याचा उल्लेख 'उक्त अधिसुचना' असा करण्यात आला आहे) प्राथमिक नगर रचना परियोजना नैना क्र. १ मंजूर केली आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिसुचनेमध्ये काही त्रुटी असुन त्या दुर करण्याकरिता उक्त अधिसुचनेस शुध्दीपत्रक निर्गमित करणे आवश्यक आहे, असे शासनाचे मत झाले आहे;

त्याअर्थी, आता शासन उक्त अधिसुचनेस खाली नमूद केल्यानुसार शुध्दीपत्रक निर्गमित करीत आहे;

**<u>शुध्दीपत्रक :-</u>**

शासन अधिसुचना क्र. टिपीएस-१२१९/१८६५/प्र.क्र.१०८/१९/नवि-१२, दि.३/९/२०१९ च्या परिच्छेद क्र.०१ मध्ये खालील वाक्य समाविष्ट करण्यात येत आहेत.

उक्त अधिसूचनेत प्राथमिक नगर रचना परियोजना मंजूरीचे नमूद करण्यात आलेले कलम ८६(२) ऐवजी कलम ८६(१) असे वाचावे.

सदरची मंजूर प्राथमिक नगर रचना परियोजना अधिनियमाच्या कलम ८६(२)(a) मधील तरतुदीनुसार मुख्य नियोजक, नैना, सिडको भवन, सीबीडी, बेलापूर, नवी मुंबई यांच्या कार्यालयामध्ये आम नागरिकांच्या अवलोकनार्थ ठेवण्यात आली आहे.

सदरची मंजूर प्राथमिक नगर रचना परियोजना अंमलात आल्याचा दिनांक ११/०२/२०२० असा आहे.

लवादांनी कलम ७२(५) व ८२(२) अन्वये प्राथमिक नगर रचना परीयोजना-१ सादर करताना मंजूर प्रारुप नगर रचना परीयोजनेतील अंतिम भूखंड क्र.३१ व ३४ मधून जाणारा दक्षिणोत्तर १५.०० मी. रुंदीचा रस्ता रद्द करुन लगतच्या भुखंडांमध्ये केलेले फेरबदलाचे प्रस्ताव अमान्य करण्यात येत असून त्याऐवजी कलम ६८(२) अन्वये मंजूर केलेल्या प्रारुप नगर रचना परीयोजनेतील प्रस्ताव मान्य करण्यात येत आहेत.

सदर अधिसूचनेच्या परिशिष्ट-२ मध्ये लवादांच्या नामंजूर केलेल्या प्रस्तावांच्या जागी कलम ६८(२) नुसार मंजूर केलेल्या अनुषंगिक तरतुदी कायम करण्यात येत आहेत.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,**

Ashok Kashirao Khandekar

Digitally signed by Ashok Kashirao Khandekar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Urban Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=0b35a0c4376224197af94647ad5d3746f35b5e2e6390afc4df35bfbb6227e873, serialNumber=f69156eb95826e5c31059dc88011664594ccaec5850de17bf3f059ea7f209a75, cn=Ashok Kashirao Khandekar
Date: 2020.02.26 12:23:15 +05'30'

**(अशोक का. खांडेकर)**
**कार्यासन अधिकारी**

**प्रत माहितीसाठी व कार्यवाहीसाठी सादर.**

१) व्यवस्थापकिय संचालक, सिडको, सिडको भवन, सीबीडी, बेलापूर, नवी मुंबई.
२) संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे.
३) सहसंचालक, नगर रचना, कोकण विभाग, कोकण भवन, नवी मुंबई.
४)श्री. एस. व्ही. सुर्वे, उपसंचालक, नगर रचना (निवृत्त).
५) सहायक संचालक, नगर रचना, रायगड-अलिबाग शाखा, जि. रायगड.
६) व्यवस्थापक, शासकिय मुद्रणालय, चर्नी रोड, मुंबई-

-त्यांना विनंती करण्यात येत आहे की, सदरचे शुध्दीपत्रक महाराष्ट्र शासनाच्या साधारण राजपत्र, भाग-१, कोकण विभागीय पुरवणीमध्ये प्रसिध्द करावे.